जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAR 2012

महाराष्ट्र टाईम्स

# समाजशास्त्रातील ज्येष्ठ संशोधक हरपला

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. द. ना. धनागरे यांच्या निधनामुळे आंतरराष्ट्रीय किर्तीचे समाजशास्त्रज्ञ आणि विद्यापीठाचे समाजहित जोपसणारे व्यक्तिमत्व हरपले आहे. विद्यापीठाचे पावित्र्य, स्वायत्तता व प्रतिमांचे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये काम करुन त्या वृद्धिंगत करण्याचे कार्य केले आहे. समाजशास्त्राताली व्यापक संशोधन व विद्यार्थ्यांच्या व्यापक हितासाठी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील, अशा शब्दांत डॉ. द. ना. धनागरे यांना डॉ. धनागरे यांना शोकसभेत आदरांजली वाहण्यात आली.

**शोकसभेत डॉ. द. ना. धनागरे यांना आदरांजली**

भाकप कार्यालयात डॉ. द. ना. धनागरे यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी आयोजित केलेल्या शोकसभेत बोलताना कॉ. चंद्रकांत यादव म्हणाले, 'डॉ. धनागरे यांनी व्यापक समाजहिताचे काम करुन विद्यापीठाची प्रतिष्ठा प्रस्थापित केली होती.

शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) जिल्हाध्यक्ष प्रा. रघुनाथ ढमकले म्हणाले, 'डॉ. धनागरे यांनी विद्यापीठामध्ये नियमानुसार पारदर्शीपणाचा कारभार केल्याने विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या विकासासाठी वेगळ्या योजना राबवून विद्यापीठाचा लौकिक वाढवला. त्यांच्या योगदानाची दखल प्रत्येक शिक्षणप्रेमी घटकांना घ्यावी लागेल.'

यावेळी दिलीप पवार, प्रा. सुधाकर मानकर यांची भाषणे झाली.

12 MAR 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सत्यशोधक परशराम पाटील

**कै. परशराम रामजी पाटील, हेब्बाळ (गडहिंग्लज) या सत्यशोधक चळवळीतील व्यक्तिमत्त्वाची १३ मार्च रोजी ३० वी पुण्यतीथी. त्यानिमित्त त्यांच्या कार्याचा आढावा घेणारा हा लेख...**

'सत्यशोधक समाज' म्हटलं की आपणास क्रांतिकारी समाज प्रबोधनकार महात्मा ज्योतिराव फुले यांची आठवण येते. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. हिंदू धर्मातील बुरसटलेल्या चाली, रीती, परंपरा यावर त्यांनी कठोर प्रहार करून सत्यस्थिती समाजापुढे ठेवण्याचा वाणी आणि लेखणीने प्रयत्न केला. सत्यशोधक समाजाचे पुढे सत्यशोधक चळवळीत रुपांतर झाले. या चळवळीमुळे दबलेला दलित–पीडित समाज, बहुजन समाज जागा झाला. वर्षानुवर्षे धर्माच्या जोखडाखाली पिचलेलें समाजसेवक जागरुक झाले व रुढी, परंपरेविरुद्ध दंड थोपटून उभे राहिले. अशांपैकीच एक म्हणजे परशराम रामजी पाटील हे होत. हेब्बाळ–जलद्याळचे (ता. गडहिंग्लज) परशराम पाटील हे गावचे वतनदार पाटील पण ते आपली वतनदारी सांभाळून आपल्या संसारातच रममाण न होता या सत्यशोधक चळवळीत ओढले गेले.

कोल्हापूर संस्थानात सत्यशोधक चळवळीला राजर्षी शाहू महाराजांचा राजाश्रय लाभला. कोल्हापूरनंतर बेळगाव शहर या चळवळीचे मोठे केंद्र बनले. शामराव देसाई गुरुजी, कर्मवीर मामासाहेब काड आदींनी बेळगाव भागात मोठे कार्य केले. तेथून ते चंदगड, गडहिंग्लज, आजरा या तालुक्यात पसरले व या कार्यास मग परशराम पाटील यांनी स्वत:ला झोकून दिले. पुढे मग माधवराव बागल यांचे बंधू ॲड. वसंतराव बागल, बाबुराव पेंटर, दिनकरराव चव्हाण, भास्करराव जाधव आदी मान्यवरांचा



सहवास परशराम यांना लाभला आणि मग राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वेध घेत त्यांनी हे कार्य पुढे नेण्याचा निश्चय करुन या कार्यास वाहून घेतले.

परशराम पाटील यांचे शिक्षण मराठी चौथीपर्यंत कर्नाटकातील दड्डी येथे झाले. त्यावेळी ते खवणेवाडी येथे मामाच्या गावी राहात होते. दड्डी–खवणेवाडी हे तीन मैलांचे अंतर ते पायी चालत जात–येत असत. आपल्याला शिक्षणासाठी पडलेला त्रास इतरांना पडू नये, त्यांना जवळपास शिकण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी त्यांच्याकडे पाटीलकी आल्यानंतर भरमाच्या देवळात सरकारी मदतीने गावात मराठी चौथीपर्यंत शाळा सुरु केली. दरम्यान आजुबाजूच्या खेड्यातही शिक्षण प्रसाराचे कार्य त्यांनी केले. याकामी त्यांना दादू पाटील, सुबराव पाटील, लक्ष्मण दळवी, आप्पा दळवी यांचे सहकार्य लाभले. पाटील यांच्या या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यावेळच्या करवीर संस्थानच्या संस्थानिकांनी १९४५ साली शिक्षण प्रसारकार्य उत्तमरित्या केल्याबद्दल खास प्रशंसापत्र देऊन त्यांचा गौरव केला होता.

शिवाजी विद्यापीठाचे तत्कालिन कुलगुरु आप्पासाहेब पवार हे परशराम पाटील यांचे चांगले स्नेही होते. गडहिंग्लज, बेळगांव, कोल्हापूर आदी भागांतील पाटील यांचे काम त्यांनी जवळून पाहिले होते आणि म्हणून 'समाज ज्ञानी, सुखी, समृद्ध आणि बुद्धिमान व्हावा यासाठी आपण करीत असलेले कार्य लाखमोलाचे आहे" असे गौरवोद्गार काढत १९६८ साली प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान केला होता.

'सोनियाचा इतिहास' या नावाने हेब्बाळ जलद्याळ गावाच्या सहकार्याने पाटलांच्या कार्याचा आढावा या परिसरातील मुंबईस्थित लोकांनी १९८९मध्ये स्मरणिकेच्या रुपात त्यांच्या निधनानंतर प्रसिद्ध केला. आपल्या उभ्या हयातीत सत्यशोधक चळवळीतून चंदगड, आजरा, गडहिंग्लज, बेळगाव व कोल्हापूर आणि जवळच्या परिसरात बहुमूल्य कार्य करून नवीन पिढी तिमीरातून प्रकाशाकडे जावी म्हणून कार्यरत राहिलेल्या परशराम पाटील यांचे १३ मार्च १९८८ रोजी निधन झाले. त्यांना आदरांजली वाहतानाच हे कार्य जोमाने पुढे जावे, हीच सदिच्छा...

**–शंभू भाऊ बांदिकर**
**साळगाव–गोवा**
**(माजी उपसभापती, गोवा)**